MHLA090009152019

नि.दि.दा. क्र.२३३/२०१९
त्र्यंबक वि.. रसूल व इतर

## निशाणी क्र.३४ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता मधील आदेश ६ नियम १७ नुसार मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे. वादीच्या कथनानुसार सर प्रकरणात वादीने वादग्रस्त मिळकत कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी होऊन सदर मालमत्तेबाबत मोजणी अहवाल नकाशासह सादर करण्याबाबत मे. उप–अधिक्षक साहेब, भुमि–अभिलेख कार्यालय, जळकोट यांना नियुक्त करण्याबाबत मे. न्यायालयात अर्ज दिला होता. सदर अर्ज मंजूर होऊन मे. न्यायालयात सदर कोर्ट कमिशनरने अहवाल सादर केलेला आहे. सदरील अहवालानुसार तुकडा क्र.१ मधील ११ आर जमीन प्रतिवादी क्र.१० च्या ताब्यात असल्याचे दर्शविले आहे. तसेच तुकडा क्र.२ मधील ६ आर जमीन ही प्रतिवादी क्र. ४ च्या ताब्यात असल्याचे दर्शविले आहे. सबब, सदरील जमिनी वादीस परत मिळाव्या म्हणून मुळ दाव्यात बदल करणे गरजेचे असल्याचे वादीने कथन केले आहे.

२. सदरील अर्जावर प्रतिवादी क्र. ९, १२ ते १५ यांनी त्यांना कुठलाही आक्षेप नसल्याचे असे लेखी म्हणणे दिले आहे. अर्जाचे अवलोकन केले. तसेच, अभिलेखावर दाखल कागदपत्रे व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद सविस्तर ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जानुरुप कथन केले आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता मधील आदेश ६ नियम १७ व कलम १५१

नुसार न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय्य असेल अशा रितीने व अटींवरती फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देता येते. तसेच, पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा करण्याची परवाणगी देऊ शकते. प्रस्तुतच्या अर्जाचे व दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दाव्यात वादीने दुरुस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरूप बदलणार नाही. याउलट, याच ठिकाणी सर्व पक्षकारांमधील वादातील प्रश्न योग्य पुराव्यानिशी ठरविता येतील. सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादी व प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होण्यासारखे नाहीत. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मुळ दाव्यात योग्य ती दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्यावयात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.01.09 18:04:52 +0530

(एन.जे.चव्हाण)

उदगीर　　　३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दिनांक ०९/०१/२०२५.　　　उदगीर.